# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**बातमी क्र. १**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे नॅक पुनर्मूल्यांकनाला सामोरे जात असून मंगळवार दि. २३ ऑगस्ट पासून नॅक समिती विद्यापीठाला भेट देणार आहे. त्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि प्रशाळा यांची जय्यत तयारी पूर्णत्वास आली आहे.

दि. २३ ते २५ ऑगस्ट असे तीन दिवस नॅक समिती विद्यापीठाला भेट देणार आहे. पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या साखळीला विद्यापीठ सामोरे जात आहे. सन २००१ मध्ये विद्यापीठाला नॅककडून चार स्टार, सन २००९ मध्ये बी ग्रेड (2.88 CGPA) प्राप्त झाली. सन २०१५ मध्ये तिसऱ्या साखळीत अे ग्रेड (3.11 CGPA) प्राप्त झाली. आता चौथी साखळी आहे. नॅकच्या या पुनर्मूल्यांकनासाठी विद्यापीठात गेल्या अनेक महिन्यांपासून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व तयारी सुरु आहे. दि. ११ व १२ ऑगस्ट रोजी माजी कुलगुरू प्रा. आर.एस. माळी, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. विजय खोले आणि मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. आर.डी. कुलकर्णी यांच्या समितीने पूर्वतयारीचा आढावा घेवून काही सूचना केल्या.

तत्कालीन कुलगुरू प्रा. पी.पी. पाटील यांनी अडीच वर्षांपूर्वी सुकाणू समिती स्थापन केली होती. समितीचे समन्वयक म्हणून प्रा. व्ही.एल. माहेश्वरी आणि सचिव प्रा. समिर नारखेडे व गुणवत्ता निर्धारण कक्षाचे संचालक म्हणून प्रा.एस.टी. इंगळे यांनी काम पाहिले आणि प्रशाळांचे संचालक आणि विभागप्रमुख तसेच प्रशासकीय विभागप्रमुख यांच्या वेळोवेळी बैठका घेवून विद्यापीठाचा स्वयंमूल्यांकन अहवाल तयार केला. १३ प्रशाळा, १ इन्स्टिट्यूट, विद्यापीठाचे ३ उपकेंद्र आणि प्रशासन यांच्याकडून प्राप्त माहितीवर हा अहवाल तयार करण्यात आला. यामध्ये विद्यापीठाचे ध्येय धोरण, प्रशाळांमधील संशोधन, शैक्षणिक प्रगती, उपलब्ध पायाभूत सुविधा, मूल्यशिक्षण, विस्तारसेवा आदींचा या अहवालात समावेश आहे. जानेवारी २०२२ मध्ये विद्यापीठाने नॅककडे हा स्वयंमूल्यांकन अहवाल पाठविल्यानंतर जून मध्ये नॅक द्वारे हा अहवाल मान्य करण्यात आला. या अहवालाच्या आधारे नॅकद्वारे विद्यापीठाचे ७०% मूल्यमापन झालेले असून ३०% गुणवत्ता आधारीत मूल्यमापनासाठी नॅक समिती विद्यापीठाला प्रत्यक्ष भेट देत आहे.

विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात संशोधन, शैक्षणिक विकास यामध्ये आघाडी घेतलेली असून अनेक संस्था व विद्यापीठांची सामंजस्य करार केले आहेत. अभ्यासक्रमात नवे बदल, परीक्षा पध्दतीतील काही नवे प्रयोग, विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राबविल्या जाणाऱ्या योजना, विद्यापीठातील पायाभूत सुविधा यामुळे विद्यापीठाची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यात आत्मविश्वास वाढीला लागला असून नॅकला सामोर जाण्यास सर्व घटक सज्ज झाले आहेत. या तीन दिवसात नॅक समिती सदस्य हे विद्यापीठ प्रशाळा, प्रशासकीय विभाग, वसतिगृह, क्रीडा संकुल, आदींना भेट देवून प्रत्यक्ष पाहणी करतील. कुलगुरूं समवेत समिती सदस्य चर्चा करतील.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र प्रशाळा आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. १८ ऑगस्ट रोजी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२०' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी अध्यक्षस्थानी होत्या. प्रा. इंगळे यांनी नव्या शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणात होवू घातलेल्या बदलाबाबतची माहिती दिली. पहिल्या सत्रात धुळे येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. मंजुषा क्षीरसागर यांनी शैक्षणिक धोरण : शक्तीस्थाने आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करतांना शिक्षणाचा आकृतीबंध, भाषाविषयक धोरण, परीक्षा व

मूल्यमापन या घटकांविषयी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात. साने गुरूजी विद्या प्रबोधिनी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. भुकन यांनी उच्च शिक्षणाच्या दृष्टीने शक्तीस्थळाविषयी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात अधिष्ठाता तथा के.सी.ई. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॅ. ए. आर. राणे यांनी शैक्षणिक धोरण व शिक्षण प्रणाली याविषयावर मार्गदर्शन केले. या वेबिनारमध्ये २०० जणांनी सहभाग घेतला. डॉ. स्वाती तायडे यांनी परिचय करून दिला. डॉ. मनिषा इंदाणी यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटन सत्राचे आभार डॉ. संतोष खिराडे यांनी मांडले. जयश्री पाटील यांनी इतर सत्राचे आभार मानले. डॉ. रणजित पारधे तसेच कर्मचारी जयेश पाटील, विष्णू कोळी यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील उपयोजित व भूविज्ञान विभाग, भूजल सर्व्हेक्षण यंत्रणा जळगाव आणि जियो-फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राष्ट्रध्वजासंबंधी नियम आणि भूजल साक्षरता या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली.

जियो-फोरमचे अध्यक्ष डॉ. उदय कुलकर्णी यांच्याहस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत १३० जणांनी सहभाग घेतला. भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणेच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. अनुपमा पाटील, सहायक वर्षा जैन, भावेश पाटील यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. कुलगुरू प्रा.व्ही. एल. माहेश्वरी, प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी, विकास यंत्रणेचे आयुक्त पी.डी. जोशी यांचे या स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले अशी माहिती विभाग प्रमुख प्रा.एस.एन. पाटील यांनी दिली.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राद्वारे (केसीआयआयएल) भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ नवउद्योजकीय संकल्पनांची निवड करण्यात येणार असून त्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि अर्थसहाय्य केले जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून मागविण्यात येणा-या प्रस्तावाला ३० ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

यंदा भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त या इन्क्युबेशन केंद्राकडून ७५ उद्योजकीय नवसंकल्पनांची निवड केली जाणार आहे. अशा संकल्पनांमधूनच स्टार्टअप सुरु होऊ शकतील असा विद्यापीठाला विश्वास असल्यामुळे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी या अमृत महोत्सवी वर्षात ७५ जणांच्या या संकल्पनांना चालना देण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि अर्थसहाय्य देण्याचे ठरविले आहे. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थी, माजी विद्यार्थी आदी घटक या नवसंकल्पना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरकडे ३० ऑगस्ट पर्यंत https://forms.gle/Mh1ohBTxiopRktKn8या लिंकवर अर्ज सादर करावेत, अशी माहिती प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ईमेल/बातमी/२०२२ दि.१९ ऑगस्ट, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी